# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## बातमी दि. १ ऑगस्ट,२०१९

जळगाव १ (      ) जगात परिवर्तन आणण्यसाठी नवे शैक्षणिक धारेणाची यशस्वीपणे अंमलबजावणी करणे ही शिक्षकांची जबाबदारी आहे शिक्षकांनी ते स्वीकारावे असे आवाहन विद्यापीठाचे व्यवस्थापन परीषद सदस्य प्रा.नितीन बारी यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात आयोजित शारीरिक शिक्षण संचालकांच्या क्रिडा शिबीरात केली.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात आयोजित शारीरिक शिक्षण संचालकांच्या क्रिडा शिबीराच्या चौथ्या दिवशी गुरुवार दि. १ ऑगस्ट रोजी प्रा.बारी बोलत होते. यावेळी मंचावर विद्यापीठ क्रिडा संचालक डॉ. दिनेश पाटील हे होते. श्री. बारी यांनी नवीन शैक्षणिक धोरणाची माहिती विस्तृतपणे मांडली. विद्यापीठस्तर क्रिडा क्षेत्रात प्रगतीसाठी क्रिडा शिक्षकांनी कार्य करावे. खेळाडूंची गुणवत्ता वाढीकडे विशेष लक्ष द्यावे. भारत सरकार खेळांकरिता विशेष अनुदान देणार आहे. भारतातील पारंपरिक खेळांना राष्ट्रीय दर्जा मिळणेसाठी क्रिडा शिक्षकांनी विशेष लक्ष द्यावे असेही ते म्हणाले.

क्रिडा शिबीराची सुरुवात मैदानावरील सत्राने सकाळी ६.०० वाजता मैदानावर झाली. त्यावेळी प्राणायाम, योग प्रात्यक्षिके, एरोबिक्स, रनिंग, मेडीटेशन इ. मध्ये शारिरीक शिक्षण संचालकांनी सहभाग घेतला.

चर्चा सत्रात भालोद येथील प्रा.मुकेश पवार यांनी धनुर्विद्या या खेळाचा इतिहास व आजपर्यंत झालेले बदल याची माहिती दिली. धनुर्विद्या खेळाकरीता साहित्य, सुरक्षिततेचे नियम, पंचांचे कार्य आणि मैदानाची माहिती यावेळी विस्तृतपणे त्यांनी मांडली.

जळगाव येथील मु.जे. महाविद्यालयाच्या प्रा. श्रीकृष्ण बेलोरकर यांनी महाराष्ट्र शासनाकडून क्रिंडागण सपाटीकरणे, मैदान तयार करणे, व्यायामाची साहित्य खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य मिळत असते त्याचा लाभ घ्यावा. तसेच आमदार निधी क्रिडा योजना अंतर्गत क्रिडा साहित्यासाठी तरतूद असते आणि खासदार निधी मध्ये विविध खेळांसाठी खेलो इंडियासाठी अनुदानांतर्गत ट्रेनिंग सेंटर मिळू शकते.

नोबल फाऊंडेशन व दिपस्तंभ चे संचालक जयदिप पाटील यांनी पढेगा और खेलेंगा इंडिया तो ही बढेगा इंडिया बनले पाहिजे. क्रिडा शिक्षक हा उत्तम प्रशिक्षक व मानसशास्त्राची जाण असलेला हवा. याकरीता भीष्मराज बाम यांचे उदाहरण त्यांनी दिले. विद्यार्थ्यांना उत्तम खेळाडू होण्यासाठी प्राणायाम व योगासने आवश्यक आहेत असेही त्यांनी सांगितले.

जळगाव येथील गोदावरील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रा.आसिफ खान यांनी क्रिडा पुरस्काराबाबत विविध माहिती दिली.

उद्या सकाळ सत्रात मैदानावरील प्रात्यक्षिके, प्राणायाम, योगाभ्यास क्रिडा संचालकांडून करण्यात येणार आहे. त्यांनतर सहभागी शारिरीक शिक्षण संचालकांचे चर्चासत्र आयोजित केले आहे अशी माहिती विद्यापीठ क्रिडा संचालक डॉ.दिनेश पाटील यांनी दिली.

-------------------------------------------------------------------------------------------------------

जा.क्र. : कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : १ ऑगस्ट, २०१९

प्रति,

मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जळगाव दि. (          ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला सन २०१९-२० करिता नवोपक्रम प्रोत्साहन केंद्र (Innovation Facilitation Centre) सुरु करण्यास भारत सरकारच्या विज्ञान व औद्योगिक संशोधन विभागाकडून आठ लाख रुपयांचे अनुदान प्राप्त झाले आहे.

कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील व प्र-कुलगरु प्रा.पी.पी.माहुलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाने नवोपक्रम प्रोत्साहन केंद्राचा प्रस्ताव भारत सरकारच्या विज्ञान व औद्योगिक संशोधन विभागाकडे सादर केला होता. देशभरातून प्राप्त झालेल्या विविध विद्यापीठांच्या प्रस्तावामधून कबचौउमविच्या प्रस्तावाची निवड करण्यात आली. त्यासाठी आठ लाख रुपयांचे अनुदान मंजूर झाले आहे. या नवोपक्रम प्रोत्साहन केंद्राचा उद्देश संशोधनात्मक दर्जा उंचावून पेटंटसाठी जागृती निर्माण करणे. संशोधक, विद्यार्थी तसेच शिक्षकांना स्टार्टअपसाठी प्रोत्साहन देणे असा असून केंद्रामार्फत नाविन्यपूर्ण संशोधनाला चालना मिळण्यासाठी प्रशिक्षण, कार्यशाळा, व्याख्यानाद्वारे मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या केंद्राचे कामकाज विद्यापीठातील बौद्धीक संपदा कक्षाचे सदस्य सचिव प्रा.भुषण चौधरी पाहणार आहेत.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/आयएफसी-बातमी/हस्तदेय/२०१९          दि. ०१ ऑगस्ट,२०१९

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,
कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिद्ध करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी